कोथरूड-बावधन क्षेत्रिय कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र. 09L2
दिनांकः- 8/3/2021

# आदेश

**विषय :- कोरानाविषाणू ( कोव्हीड १९) आजाराच्या अनुषंगाने प्रतिबंधित क्षेत्र ( Micro Containment Zone) सुक्ष्म प्रतिबंधक क्षेत्र घोषित करणे बाबत.**

संदर्भ :- १. साथ रोग अधिनियम १८९७ ची अमलबजावणी सुरू झाल्या बाबतची अधिसुचना दि.१३/०३/२०२०.
२. महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम २०२०
३. केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
४.सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांचे कडील अधिसुचना क्र.कोरोना – २०२०/ ५८ आरोग्य दि.१३/०३/२०२०

माहे फेब्रुवारी प्रथम सप्ताहा पासुन ( कोव्हीड १९ ) च्या रूग्ण वाढीचा दर वाढलेला असुन त्यामुळे कोरोना विषाणुची दुसरी लाट येण्याची शक्यता नाकारता येत नाही. सद्यस्थितीमध्ये कोथरूड- बावधन क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील खालील ठिकाणी ( कोव्हीड १९ ) विषाणुचा संसर्ग वाढत असल्याने रूग्ण आढळून येत आहेत.

| अ.क्र. | क्षेत्रिय कार्यालयाचे नांव | प्रभागाचे नांव | सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्राचे नांव |
|---|---|---|---|
| १ | कोथरूड-बावधन | प्रभाग क्र.१०, बावधन - कोथरूड डेपो | सी वृंदावन हौ. सोसायटी, सेक्टर डी., डी.पी.रोड, सृष्टी सोसायटी समोर, कोथरूड, पुणे ३८. |
| २ | कोथरूड-बावधन | प्रभाग क्र.१०, बावधन - कोथरूड डेपो | स्प्रिंग फिल्ड सोसायटी, गांधी भवन, कोथरूड, पुणे, कोथरूड, पुणे ३८ |
| ३ | कोथरूड-बावधन | प्रभाग क्र.११, रामबाग कॉलनी - शिवतीर्थ नगर | मनीषा टॉवर्स, एम.आय.टी.रोड, कोथरूड, पुणे ३८. |
| ४ | कोथरूड-बावधन | प्रभाग क्र.११, रामबाग कॉलनी - शिवतीर्थ नगर | ओम साई कृपा सोसायटी, माधवबाग, शिवतीर्थ नगर, कोथरूड, पुणे ३८ |
| ५ | कोथरूड-बावधन | प्रभाग क्र.१२, मयुर कॉलनी - डहाणुकर कॉलनी | सदाशिव अपार्टमेंट, भेलकेनगर, कोथरूड, पुणे ३८ |

तरी कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजनेसाठी सदरचा परिसर हा (Micro Containment Zone ) सुक्ष्म प्रतिबंधित क्षेत्र म्हणुन घोषीत करण्यांत येत आहे.

वरील परिसर व त्याच्या आजुबाजुच्या परिसरात राहणाऱ्या नागरीकांनी खालील सुचनांचे पालन करणे आवश्यक आहे.

सोसायटी / घर / बंगला तसेच चाळ इत्यादी ठिकाणी राहणाऱ्या नागरीकांनी त्यांच्या आवारात अथवा घरी भेट देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे पल्स ऑक्सीमीटर आणि थर्मल डिटेक्टरच्या सहाय्याने तपासणी केली जावी. कोव्हीड साठी पल्स

D:\Office\Genral.docx

Recd
Bagd
9/3/2021
सामान्य प्रशासन विभाग
पुणे महानगरपालिका

ऑक्सीमीटर तपासणी ही दिशा दर्शक आहे. ज्या व्यक्तीची ओ-२ सॅच्युरेशन लेवल ही ९४ च्या खाली असल्यास त्यांस त्वरीत पुढील तपासणी करून घेणे बाबतची सुचना देण्यांत यावी.

सोसायटी / घर / बंगला या ठिकाणी राहणाऱ्या जेष्ठ व्यक्ती/ १० वर्षा खालील मुले / आजाराने ग्रस्त असलेल्या व्यक्ती यांची पल्स ऑक्सीमीटर द्वारे तपासणी करून त्यांची दैनंदिन नोंद ठेवण्यात यावी.

या अनुषंगाने ज्या व्यक्तींची ओ-२ सॅच्युरेशन लेवल ही ९४ किंवा त्या खाली असल्यास अशा व्यक्तींची डॉक्टरांच्या सल्याने तत्काळ स्वॅब टेस्ट करून घेण्यांत यावी. स्वॅब टेस्ट करणे करीता कोथरूड – बावधन क्षेत्रिय कार्यालया मार्फत कै.आण्णासाहेब पाटील शाळा, शास्त्रीनगर पोलीस चौकी समोर, कोथरूड, पुणे ३८ या ठिकाणी मोफत सोय उपलब्ध करून देण्यांत आलेली आहे. या बाबत अधिक माहिती आवश्यक असल्यास आपण आपले परिसरातील आरोग्य निरीक्षक यांच्याशी संपर्क साधावा.

आपले सोसायटी / चाळ इत्यादी ठिकाणी कोव्हीड १९ व्यतिरीक्त इतर आजारांकरीता रूग्णालयात दाखल असणाऱ्या रूग्णांबाबतची माहिती कृपया kothrud@punecorporation.org या ई-मेल आयडीवर उपलब्ध करून द्यावी. जेणे करून केवळ कोव्हीड १९ चे अनुषंगाने माहितीचे विश्लेषन करून वैद्यकिय विभागा मार्फत पुढील मदत उपलब्ध करून देता येईल.

सोसायटीच्या आवारात सोशल डिस्टन्सींगचे पालन केले जाईल व प्रत्येक व्यक्ती मास्कचा वापर करेल या बाबतची दक्षता घ्यावी.

वरील सुचनांचे पालन करून आपण आपली आपल्या कुटूंबाची तसेच आपल्या परिसराचा कोव्हीड १९ पासुन बचाव करू शकता.

पुणे शहर कोरोना विषाणु मुक्त करणे करीता आता पर्यंत आपण दिलेल्या सहकार्या बद्दल कोथरूड- बावधन क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका यांच्या वतीने मी आपला ऋणी असुन अद्याप ही कोरोनाचे संकट पुर्णत: न टळल्याने आपण सहकार्य करावे, हि विनंती.

मा. स कळावे,

( संदिप कदम )
महापालिका सहाय्यक आयुक्त
कोथरूड-बावधन क्षेत्रिय कार्यालय
पुणे महानगरपालिका

प्रत महितीस्तव व पुढील कार्यवाहीसाठी.

१. मा.अति.महापालिका आयुक्त (ज), पुणे महानगरपालिका.
२. मा.उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र.२, पुणे महानगरपालिका.
३. मा.सहाय्यक आरोग्य प्रमुख, पुणे महानगरपालिका.
४. मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोथरूड पोलीस स्टेशन, शास्त्रीनगर, कोथरूड, पुणे
५. मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक,हिंजवडी पोलीस स्टेशन, हिंजवडी, पुणे

कोथरूड - बावधन क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका

सुक्ष्म प्रतिबंधित क्षेत्राबाबत दैनंदिन अहवाल

| अ.क्र. | दिनांक | क्षेत्रिय कार्यालयाचे नांव | प्रभागाचे नांव | सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्राचे नांव | कोरोना बाधितांची संख्या | आदेश क्र. | दिनांक पासुन | दिनांक पर्यंत | कालावधी | प्रतिबंधित क्षेत्रात फलक/ बॅरिगेटस लावले आहे / नाही | इमारत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ०९-०३-२०२१ | कोथरूड-बावधन | प्रभाग क्र.१०, बावधन - कोथरुड डेपो | सी वृंदावन हौ. सोसायटी, सेक्टर डी., डी.पी.रोड, सृष्टी सोसायटी समोर, कोथरूड, पुणे ३८. | ७ | कोथरूड - बावधन क्षेत्रिय कार्यालय, जा. क्र.७१८२ दि.०९/०३/२०२१ | ०४/०३/२०२१ | १७/०३/२०२१ | १५ दिवस | | 09 |
| २ | ०९-०३-२०२१ | कोथरूड-बावधन | प्रभाग क्र.१०, बावधन - कोथरुड डेपो | स्प्रिंग फिल्ड सोसायटी, गांधी भवन, कोथरूड, पुणे, कोथरूड, पुणे ३८ | ५ | कोथरूड - बावधन क्षेत्रिय कार्यालय, जा. क्र.७१८२ दि.०९/०३/२०२१ | ०४/०३/२०२१ | १७/०३/२०२१ | १५ दिवस | | 09 |
| ३ | ०९-०३-२०२१ | कोथरूड-बावधन | प्रभाग क्र.११, रामबाग कॉलनी - शिवतीर्थ नगर | मनीषा टॉवर्स, एम.आय.टी.रोड, कोथरूड, पुणे ३८. | ५ | कोथरूड - बावधन क्षेत्रिय कार्यालय, जा. क्र.७१८२ दि.०९/०३/२०२१ | ०४/०३/२०२१ | १७/०३/२०२१ | १५ दिवस | | 09 |
| ४ | ०९-०३-२०२१ | कोथरूड-बावधन | प्रभाग क्र.११, रामबाग कॉलनी - शिवतीर्थ नगर | ओम साई कृपा सोसायटी, माधवबाग, शिवतीर्थ नगर, कोथरूड, पुणे ३८ | ९ | कोथरूड - बावधन क्षेत्रिय कार्यालय, जा. क्र.७१८२ दि.०९/०३/२०२१ | ०५/०३/२०२१ | १८/०३/२०२१ | १५ दिवस | | 09 |
| ५ | ०९-०३-२०२१ | कोथरूड-बावधन | प्रभाग क्र.१२, मयुर कॉलनी - डहाणुकर कॉलनी | सदाशिव अपार्टमेंट, भेलकेनगर, कोथरूड, पुणे ३८ | ६ | कोथरूड - बावधन क्षेत्रिय कार्यालय, जा. क्र.७१८२ दि.०९/०३/२०२१ | ०७/०३/२०२१ | २०/०३/२०२१ | १५ दिवस | | 09 |

( संदिप कदम )
महापालिका सहाय्यक आयुक्त
कोथरूड-बावधन क्षेत्रिय कार्यालय
पुणे महानगरपालिका